# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०७/२०२४ (शनिवार) दुपार**

---

## मोटर सायकल चोरी करणारा अट्टल गुन्हेगार गजाआड

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणची कारवाई :—

दिनांक १२/०७/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास मोटर सायकल चोरीच्या गुन्ह्यांचे अनुषंगाने गुप्त बातमीदारा कडून एका संशयित इसमा बद्दल महिती प्राप्त झाली. गोपनिय माहीतीच्या आधारे संशयीत इसम नामे **करण गणेश उके, वय १९ वर्ष, रा. चांगदेव नगर, खामला, नागपुर** यास पथकाने सापळा रचून इसमास ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातून चोरी केलेली एक काळया रंगाची बिना क्रमांकाची बुलेट मोटर सायकल किं. ७०,०००/— रु जप्त करून आरोपीची वैद्यकिय तपासणी करुन जप्त मुद्देमाल व कागदपत्रांसह पोलीस ठाणे MIDC बोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील दोन मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. १) पोलीस ठाणे MIDC बोरी अप. क्र. १८४/२४ कलम ३७९ भा.द.वि. २) पोलीस ठाणे बोरी अप. क्र. ५०५/२४ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरिक्षक आशिषसिंग ठाकूर, पोलीस उपनिरिक्षक आशिष मोरखडे, सफौ मिलिंद नांदुरकर, महेश जाधव, पोहवा मयूर ढेकळे, अमृत किनगे, रोहन डाखोरे, पोना सतीश राठोड यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर